

## कुदळवाडीत सातव्या दिवशी ६३३ पत्राशेड बांधकामे निष्कासित

e Paper


# दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष ३रे

www.metrocityvrutant.in शनिवार दिनांक 15/02/२०२५ METRO CITY VRUTANT

पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 48 ‖ RNI - MAHMAR/2021/51259 ‖ metrocity924@gmail.com


# गतिमान आणि प्रगतीशील कायदा-सुव्यवस्था उभी करणार!

## अमित शाह यांच्यासोबत देवेंद्र फडणवीस यांची बैठक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

नवी दिल्ली : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नवीन फौजदारी कायद्यासंदर्भातील महाराष्ट्रातील अंमलबजावणीचा आढावा घेतला. या तीन कायद्याच्या अंमलबजावणीतून राज्यात गतिमान आणि प्रगतीशील कायदा-सुव्यवस्था उभी करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले.माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे तीन नवीन कायद्यांच्या संदर्भात आढावा बैठक घेतली. या



कायद्यांची राज्यात अंमलबजावणी कशा पद्धतीने होते आहे, त्यासाठी निर्माण करावयाच्या संस्थात्मक आणि पायाभूत सुविधांची स्थिती काय आणि किती प्रकरणे दाखल झाली याचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. भारतीय न्यायसंहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष संहिता असे हे तीन कायदे आहेत.

अलीकडेच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि हरियाणा या राज्यांकडून आढावा घेतला होता. आज महाराष्ट्राचा आढावा घेण्यात आला.आरोपींना वारंवार कोर्टात फोर्स घेऊन जावे लागू नये, यासाठी नवीन कायद्यान्वये कारागृहात साक्षीसाठी क्युबिकल्स उभे करुन ते न्यायालयाशी ऑनलाईन जोडून देण्यात येणार आहेत. प्रत्येक कोर्टाचे विशिष्ट क्युबिकल असणार आहेत. 6 ते 8 महिन्यात हेही काम आम्ही पूर्ण करणार आहोत. पोलिस वाहन, सुरक्षेवरील ताण आणि न्यायालयातील गर्दी यामुळे कमी होणार आहे.

नवीन कायद्यानुसार, वारंवार न्यायालयात तारखा मागता येणार नाही, याची तरतूद असल्याने सरकारी वकिलांना त्याचे प्रशिक्षण द्यावे लागणार आहे. अतिशय चांगले मार्गदर्शन आजच्या बैठकीत मिळाले आहे. हे तिन्ही कायदे लागू करण्यासंदर्भात अधिक वेगाने आम्ही काम करु, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# "..पण एकनाथ शिंदेंचा केलेला सन्मान रुचलेला नाही"- संजय राऊत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : एकनाथ शिंदेंनी शिवसेना फोडली नसती, तर अजित पवार फुटले नसते, सरकार कोसळले नसते. त्यामुळे मी जी भूमिका मांडतोय ती शरद पवारांची भूमिका असायला हवी. एकनाथ शिंदे या माणसाने अमित शाह यांच्याशी हातमिळवणी करुन पक्ष फोडले, तुम्ही त्याची भलामण करत आहात. मी बोललो, कारण माझ्यात हिंमत आहे, हे ढोंगी, भंपक लोक आहेत. मला अजिबात पोटदुखी नाही. शरद पवारांनी तिथे जाणे महाराष्ट्राला रुचलेले नाही. त्यांच्या पक्षातील नेत्यांना पटलेले नाही, असा दावा ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला.सरहदच्या वतीने





उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा 'महादजी शिंदे राष्ट्र गौरव' पुरस्काराने गौरव करण्यात आला. शरद पवार यांच्या हस्ते एकनाथ शिंदे यांचा सन्मान करण्यात आला. यावरून ठाकरे गटाकडून सातत्याने टीका करण्यात येत आहे. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पुन्हा एकदा याच मुद्द्यावरून एकनाथ शिंदे आणि भाजपावर हल्लाबोल केला आहे. तर दुसरीकडे शरद पवार यांना पित्यासमान असल्याचे म्हटले आहे.ते म्हणाले, माझे आणि पवार साहेबांचे संबंध यांना माहिती नाहीत. ते आम्हाला पित्यासमान आहेत. पण मी आमच्या पक्षाची भूमिका मांडली. शरद पवारांवर टीका केली नाही, असे संजय राऊत यांनी स्पष्ट केले. तसेच शरद पवारांबद्दल आमच्या मनात नाराजी नाही. शरद पवारांसारख्या ज्येष्ठ नेत्याने महाराष्ट्राने ज्याला गद्दार म्हणून संबोधित केले, ज्याने बेईमानी करुन अमित शाह यांच्याशी हातमिळवणी करुन सरकार पाडले. त्याचा सत्कार शरद पवार यांचा अपमान आहे, अशी टीका संजय राऊतांनी केली.

# कुदळवाडीत सातव्या दिवशी 633 पत्राशेड बांधकामे निष्कासित

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : चिखली - कुदळवाडी येथे सलग सातव्या दिवशी १९२ एकर जागेत असलेल्या ६३३ अनधिकृत पत्राशेड बांधकामांवर निष्कासन कारवाई करण्यात आली. याठिकाणी असलेले अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदामे, भंगार दुकाने तसेच अनधिकृत बांधकामे या कारवाईमध्ये निष्कासित करण्यात आले.**



नियोजित विकास आरक्षणे आणि नागरी सुविधा जागेवरील अनधिकृत बांधकामे हटविण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त मोहिमेतून चिखली - कुदळवाडी येथे निष्कासनाची कारवाई करण्यात येत आहे. याठिकाणी आज ८३ लाख ९७ हजार २४९ चौरस फूट बांधकाम निष्कासित करण्यात आले. यामध्ये एकूण ६३३ बांधकामाचा समावेश होता.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आणि महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई हाती घेण्यात आली. या कारवाई वेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, उपआयुक्त मनोज लोणकर, राजेश आगळे, सीताराम बहुरे, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, शीतल वाकडे, अमित पंडित, सुचिता पानसरे, किशोर ननवरे, श्रीकांत कोळप, महेश वाघमोडे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांच्यासह कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता सहभागी झाले होते. सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अतिरिक्त पोलिस आयुक्त वसंत परदेशी यांच्या अधिपत्याखाली पोलीस उपआयुक्त स्वप्ना गोरे, डॉ. शिवाजी पवार, बापू बांगर, विवेक पाटील यांच्या नेतृत्वाखाली या परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या निष्कासनाच्या कारवाईमध्ये महापालिका अतिक्रमण धडक कारवाई पथकामधील ४ कार्यकारी अभियंते, १६ उपअभियंते, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे १८० जवान, ६०० पोलीस आणि मजूर कर्मचारी सहभागी झाले होते. तर ४४ पोकलेन, ८ जेसीबी, १ क्रेन आणि ४ कटर यांचा वापर करण्यात आला. ३ अग्निशमन वाहने आणि २ रुग्णवाहिका देखील याठिकाणी तैनात करण्यात आल्या होत्या. महापालिका आणि पोलीस यंत्रणेसह वीज वितरण कंपनीचे अधिकारी कर्मचारी देखील या कारवाईमध्ये सहभागी झाले होते.

# सावधान ! शहरात प्रदूषण करणाऱ्यावर चोवीस तास करडी नजर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहराच्या सौंदर्य व नागरिकांचे आरोग्य अबाधित राखण्या साठीसदैव तत्पर असते. त्यासाठी महापालिका वेगवेगळे उपक्रम राबवत असते. त्याचाच एक भाग म्हणून आता शहरात सार्वजनिक ठिकाणी कचरा, राडा-रोडा, प्लास्टिक, शहरात आरएमसी प्लॉटमधून होणारे हवेचे प्रदूषण, बांधकामाच्या ठिकाणी होणारा कर्कश आवाज, शहरात होणारे ध्वनी प्रदूषण, घर बांधकाम करतांना घराच्या बाहेर टाकला जाणारा राडारोडा तसेच सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण करणाऱ्यांवर महापालिका २४x७ करडी नजर ठेवणार आहे.**



त्यासाठी महानगरपालिकेने मे शुभम उद्योग प्रा. लि. व मे. सैनिक इंटलिजन्स अँड सिक्युरिटी प्रा. लि. या संस्थेची स्वतंत्रपणे नेमणूक केली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात पर्यावरणाची हानी करणाऱ्या कंपन्या किंवा समाजकंटकांवर महापालिका या संस्थेमार्फत लक्ष ठेवणार असून पर्यावरणाची हानी करणाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिका हद्दीमध्ये स्थानिक नागरिक किंवा अज्ञात नागरिक रस्त्यांच्या

कडेला नदी नाले यांच्या कडेला अनधिकृत भराव व बांधकाम राडा-रोडा टाकतात. सार्वजनिक ठिकाणी घनकचरा टाकणे परिसर अस्वच्छ ठेवणे, रस्ते पदपथावर घाण- कचरा करणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, लघुशंका करणे, सार्वजनिक सभा संपल्यानंतर साफसफाई न करणे, जीव वैद्यकीय घनकचरा सार्वजनिक ठिकाणी फेकणे, कचरा जाळणे, बंदी असलेल्या प्लास्टिकचा उपयोग करणे, मोकळ्या जागेवर अस्वच्छता ठेवणे, डास उत्पन्न करणाऱ्या जागा निर्माण करणे, तसेच लहान उद्योजक कारखानदार सांडपाणी प्रक्रिया न करता थेट नाल्यात किंवा नदी पात्रात सोडतात. या सर्व कारणांमुळे महानगरपालिका परिसरात अस्वच्छता पसरते. परिणामी पर्यवरण हानी होते.

नागरिकांच्या आरोग्याच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिकेच्या पर्यावरण

विभागाच्या पुढाकारतून पर्यावरण हानी रोखण्यासाठी मे. शुभम उद्योग प्रा. लि. व मे. सैनिक इंटलिजन्स अँड सिक्युरिटी प्रा.लि. या संस्थेची नेमणूक केली आहे. सदर संस्थेमार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील बांधकाम व्यवस्थापन २०१६, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम २०१६, बांधकाम राडा रोडा मार्गदर्शन तत्वे, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन मार्गदर्शन तत्वे, ई- कचरा व्यवस्थापन नियम २०२२, प्लास्टिक व्यवस्थापन नियम २०२२ इत्यादी नियम व अधिनियमानुसार वरील दोन्ही पथकांमार्फत २४x ७ कारवाई करण्यात येणार आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील महानगरपालिका हद्दीतील नागरिक, कारखानदार, दुकानदार, तसेच सर्व प्रकारच्या व्यावसायिकांना सूचित करण्यात येते की पिंपरी चिंचवड शहरात कोणत्याही प्रकारे पर्यावरणास हानिकारक कृती करत असाल तर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने निश्चित केलेल्या धोरणानुसार सदर नागरिक, कारखानदार, बिल्डर यांच्यावर कारवाई करण्यात येणार असून नियमांचे उल्लघन केल्यास दंडात्मक कारवाई देखील करण्यात येणार आहे.

पिंपरी चिंचवड शहरात महानगरपालिकेचे सहा हजाराहून अधिक सफाई कर्मचारी दररोज स्वच्छता करत असतात. परंतु शहराचे हे सौदर्य अबाधित राखण्यासाठी फक्त सफाई करून उपयोग नाही तर त्यासाठी नागरिकांचा सहभाग देखील गरजेचा आहे. शेखर सिंह आयुक्त तथा प्रशासक पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# जागतिक रेडिओ दिनानिमित्त 'नागझिरा' अभिवाचन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : जागतिक रेडिओ दिनानिमित्त साधून 'पीसीइटी इन्फिनिटी ९०.४ एफएम' च्या वतीने निगडी, प्राधिकरण येथील वीर सावरकर उद्यानात 'आदिम' प्रस्तुत व्यंकटेश माडगूळकर लिखित 'नागझिरा' या निसर्गवर्णनाच्या अभिवाचनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी देवराई फाऊंडेशनचे संस्थापक आणि पीसीएमसी स्मार्ट सिटी कमिटीचे सदस्य धनंजय शेडबळे, पीसीईटी च्या मीडिया अँड ब्रँडिंग विभागाचे प्रमुख डॉ. केतन देसले, प्रा. आनंद बिराजदार, डेक्कन कॉलेजच्या प्रा. डॉ. प्रज्ञा कुलकर्णी आदी उपस्थित होते. 'रेडिओ आणि हवामान बदल' ही यंदाच्या जागतिक रेडिओ दिनाची मध्यवर्ती संकल्पना होती. सामान्य माणसाच्या मनात निसर्गाबद्दल



आपलेपणाची भावना आणि जबाबदारीची जाणिव निर्माण व्हावी या उद्देशाने भंडारा जिल्ह्यातल्या नागझिरा जंगलात राहून व्यंकटेश माडगूळकर यांनी लिहिलेल्या जंगलातले दिवस या सचित्र नोंदवहीचे हे अभिवाचन डॉ. विनया केसकर आणि विराज सवाई यांनी केले. यासाठी चैतन्य जोशी यांनी पुरक असे पार्श्वसंगीत संयोजन केले होते. झाडावर लटकवलेला कंदील, तिरोडा ३२ किमी हा मैलाचा दगड, पितळी तांब्या भांडे, बैठकीवर टाकलेली कांबळ, नागझिरा जंगलाचा नकाशा अशा वस्तूंनी साधलेल्या वातावरणनिर्मितीने कार्यक्रमाची उंची वाढवली. विविध वयोगटातील उपस्थित निसर्गप्रेमी प्रेक्षकांनी वाचनास भरभरून प्रतिसाद दिला. "तळ्यापलीकडे, डोंगराच्या उतारावर जी वृक्षराजी होती, तिच्यात काळ्या डोक्याचे पिवळे हळदुले पक्षी पुष्कळ होते. पिवळ्यारंजन रंगाची ही पाखरं जेव्हा या वृक्षावरून त्या वृक्षावर भरारत, तेव्हा पिवळ्या शाल्मलीच्या फुलांनाच पंख फुटले आहेत असं, वाटे." "समोरच्या हिरवळीवर नाना कीटक होते. हे कीटक टिपण्यासाठी नाना पाखरं येत. एक नीलकंठ पाखराचं जोडपं येई, हे नीळंगर्द पाखरू पंख पसरून अधांतरी झेप घेई तेव्हा माझ्या मनात येई, की स्वातंत्र्य या वस्तूचा रंग बहुधा निळा असावा" अश्या अनेक मार्मिक वाक्यांना प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. माणसाच्या हस्तक्षेपामुळे निसर्गातल्या अन्य घटकांवर होत असलेला परिणाम, आपल्या चुकीच्या सवयींमुळे निसर्गाची होत असलेली अपरिमित हानी आणि एक जबाबदार नागरिक म्हणून आपण काय करू शकतो याविषयी शेडबळे यांनी मार्गदर्शन केलं. 'पीसीइटी इन्फिनिटी ९०.४ एफएम' निर्मिती प्रमूख माधुरी ढमाले-कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले, निर्मिती सहाय्यक विद्या राणे यांनी स्वागत केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पीसीसीओईच्या 'आर्ट सर्कल'च्या विद्यार्थ्यांनी संयोजनात सहभाग घेतला.

पीसीईटीच्या वतीने अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मातई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सर्वांना जागतिक रेडिओ दिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# परिवर्तन पॅनलच्या सर्व अधिकृत उमेदवारांचा दणदणीत विजय

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : नुकताच सिल्वरलँड रेसिडेन्सी फेज १ आणि २ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,रावेत यांची संचालक मंडळ निवडणूक पार पडली. या निवडणुकीत "परिवर्तन पॅनल"आणि 'सिल्व्हरलँड परिवार पॅनल' यांच्यात थेट मुख्य लढत होती. झालेल्या निवडणुकीत परिवर्तन पॅनलच्या सर्व १९ अधिकृत उमेदवारांनी एकतर्फा दणदणीत विजय मिळवत परिवार पॅनलचा दारुण पराभव केला. निकालानंतर सर्व विजयी उमेदवार आणि सभासदांनी गुलाल उधळत विजयी जल्लोष साजरा केला. परिवर्तन



पॅनलच्या विजयात महत्वपूर्ण भूमिका निभवणारे विजयाचे शिल्पकार आणि मार्गदर्शक श्री. दिपक मधुकर भोंडवे यांचे सर्व विजयी उमेदवारांनी मनस्वी आभार मानले. तसेच श्री. दिपक भोंडवे यांनी विजयी झालेल्या उमेदवारांचे सत्कार करत अभिनंदन केले.

**विजयी उमेदवार:**

१) सावंत अजय अशोक २) टिकू विमल ३) डुंबरे सागर प्रदीप ४) दासरी श्रीनिवास राजेशाम ५) देशपांडे श्रीकांत गजानन ६) पाटील राहुल अशोक ७) पाठक अजिंक्य संजय ८) प्रकाश अनुभव ९) भट राहुल १०) मदन कुमार ११) कुमार शैलेंद्र १२) सिंहदेव शिलाभद्र १३) सुमन सौरभ सदानंद १४) सोनी नरेंद्र १५) गेडाम रीमा शैलेश १६) लाल जुली १७) वारे गणेश जगन्नाथ १८) नवले श्रीकांत प्रकाश १९) नुगुरवार आशिष यादवराव

# देहूरोडमध्ये गोळीबार; दोन जखमी, एकाचा मृत्यू

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

देहू : पिंपरी- चिंचवड मधील देहूरोड मध्ये गोळीबाराच्या घटनेत एकाचा मृत्यू झाला असून दोघे जण जखमी आहेत. ही घटना गुरुवारी रात्री अकराच्या सुमारास घडली. या घटनेचा एक सीसीटीव्ही समोर आला असून सीसीटीव्ही मध्ये दुचाकीवरून आलेल्या दोघांवर सराईत गुन्हेगार अंदाधुंद फायरिंग करत असल्याचं स्पष्ट दिसत आहे. या घटनेमध्ये विक्रम गुरुस्वामी रेड्डी याचा मृत्यू झाला आहे. गुरुवारी रात्री वाढदिवसाच्या दरम्यान ही घटना घडली आहे. पूर्ववैमनस्यातून घडलेल्या घटनेमध्ये रेड्डी चा मृत्यू झाला आहे. रेड्डी आणि त्याचा सहकारी हे दुचाकीवरून जात होते. त्याच दरम्यान समोर उभा असलेल्या सराईत गुन्हेगाराने त्यांच्यावर फायरिंग केली. याच दरम्यान विक्रम गुरु स्वामी रेड्डी चा मृत्यू झाला आहे. तर इतर एक जण गंभीर जखमी आहे. दरम्यान त्याआधी देखील सराईत गुन्हेगाराने मारामारी केली यात. नंदकिशोर यादव नावाचा व्यक्ती गंभीर जखमी आहे. त्याच्यावर देखील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच देहूरोड पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. पोलिसांच्या हाती सीसीटीव्ही लागला असून सीसीटीव्हीच्या आधारे पोलीस सराईत गुन्हेगाराचा शोध घेत आहेत.

# व्यावसायिकावर गोळीबार करणारा निघाला चुलत भाऊ

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयातील म्हाळुंगे एमआयडीसी मधील व्यावसायिकावर गोळीबार करण्यात आला होता. याप्रकरणी पिंपरी-चिंचवडच्या गुंडा विरोधी पथकाने आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणात हत्येची सुपारी देणारा हा फिर्यादीचा चुलत भाऊ असल्याचं समोर आलेल असून त्याच्यासह इतर एकाला उत्तर प्रदेश मधून अटक करण्यात आली आहे २० जानेवारी रोजी म्हाळुंगे पोलीस ठाण्याच्या हद्दीत कैलास स्टील



कंपनीचे मॅनेजर अजय विक्रम सिंग यांच्यावर दुचाकीवरून आलेल्या दोघांनी जिवे मारण्याच्या उद्देशाने गोळीबार केला होता.यात ते थोडक्यात बचावले. या प्रकरणी म्हाळुंगे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा समांतर तपास सुरू असताना गुंडाविरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश माने यांनी तपासाची चक्रे वेगात फिरवली. पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे यांच्या सूचनांचं पालन करण्यात आलं. सीसीटीव्ही फुटेच्या आधारे मॅनेजरचा चुलत भाऊ संग्राम उर्फ चंदन आनंद सिंग याला ताब्यात घेण्यात आलं आणि त्यानेच गुन्हा केल्यास समोर आलं. हत्या करण्याच्या उद्देशाने चार कामगारांना बारा लाख रुपयांची सुपारी देण्यात आली होती. संग्राम सिंग ने चार कामगारांना अजय सिंग यांचा फोटो दाखवला. त्या कंपनीचा पत्ता आणि गुगल लोकेशन देखील देण्यात आलं.आरोपींनी घटनेच्या पाच ते सहा दिवस अगोदर वेगवेगळ्या गाड्यांमधून कंपनीचे रेकी देखील केली होती. अजय सिंग याला मारण्याचा प्लॅन होता. अखेर या याप्रकरणी रोहित सुधन पांडे याला उत्तर प्रदेशामधून अटक करण्यात आली आहे. मुख्य सूत्रधार हा फिर्यादी यांचा चुलत भाऊ असल्याचे उघड झाल आहे. इतर आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत. ही कामगिरी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# पिंपरीतील ४३८ मालमत्तांचा होणार लिलाव



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : महापालिकेने ५० हजारांपुढील थकबाकीदारांच्या औद्योगिक, निवासी, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमीन अशा ४३८ मालमत्तांच्या लिलावाची प्रक्रिया सुरू केली आहे. या मालमत्ताधारकांकडे १७ कोटी ३८ लाख ९४ हजार रूपयांची थकबाकी आहे.

कर संकलन विभागाने थकबाकीदारांच्या मालमत्ता लाखबंद करून जप्त केल्या आहेत. त्यानंतरही मालमत्ताधारकांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने महापालिकेने मालमत्तांचा लिलाव जाहीर केला आहे. एकूण ४३८ मालमत्तांची यादी कर संकलन विभागाने प्रसिद्ध केली आहे. त्यात बिगर निवासी ३००, निवासी ७६, मिश्र ४६, औद्योगिक १३, तीन मोकळ्या जमिनी अशा मालमत्ता आहेत. या मालमत्ताधारकांकडे ५० हजार ते ६३ लाखांपर्यंतची थकबाकी आहे. त्यात नामांकित बांधकाम व्यावसायिक, संस्था, व्यक्ती यांच्या शहराच्या विविध भागातील मालमत्ता आहेत.

या मालमत्ताधारकांना कर भरण्याची शेवटची मुदत २५ फेब्रुवारी देण्यात आली आहे. त्यानंतर लिलाव प्रक्रियेला सुरूवात करण्यात येणार आहे. त्यामुळे थकबाकीदारांनी २५ फेब्रुवारीपर्यंत कर भरून मालमत्तेचा लिलाव टाळावा, असे आवाहन कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी केले आहे.

सलग तीन वर्षे नियमितपणे कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांना चौथ्या वर्षीच्या मालमत्ताकरामध्ये सवलतीव्यतिरिक्त अधिकच्या दोन टक्क्यांची प्रोत्साहनपर सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे नियमित कराचा भरणा करणाऱ्या मालमत्ताधारकांनी चालू वर्षी अद्यापही कराचा भरणा केला नसेल तर अशा मालमत्ताधारकांना सलग तीन वर्षे नियमित कर भरल्यानंतर चौथ्या वर्षीच्या मालमत्ताकरावर देण्यात येणारी दोन टक्क्यांची सवलत मिळणार

# नातेवाईकाच्या लग्नास जाण्यास नकार दिल्याने पत्नीचा खून




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : नातेवाईकांच्या लग्नास जाण्यास नकार दिल्याने महिलेचा खून करण्यात आल्याचा प्रकार शिरूरमधील गणेगाव खालसा येथे घडला. पती फरार झाला असून पोलीस तपास करत आहेत. मीनाबाई ज्ञानेश्वर गांगुर्डे (वय २७, रा. गणेगाव तालुका, शिरूर) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. पती ज्ञानेश्वर आत्माराम गांगुर्डे हा फरार झाला आहे. मीनाबाईचा चुलत भाऊ ताराचंद सुकलाल मोरे (वय, २६ वर्षे, रा. सिदवाडी, ता. चाळीसगाव, जिल्हा जळगाव) यांनी तक्रार दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेगाव येथील एका मोकळ्या जागेत मीनाबाई हिचा मृतदेह आढळून आला. मीनाबाई हिने नाशिक येथे नातेवाईकांच्या लग्नास जाण्यास नकार दिला होता. त्यामुळे ज्ञानेश्वर याने तिचा गळा आवळून खून केला. त्यानंतर तो फरार झाला आहे. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले, पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी भेट दिली पोलीस उपनिरीक्षक शिवाजी मुंडे तपास करीत आहेत.

